# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२२

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

## राज्यातील सामान्य नागरिक व लोकप्रतिनिधींच्या आरोग्याकरीता योजना तयार करण्याबाबत

**(१) ४१७९ (३०-०७-२०२०) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सामान्य नागरिकांसह लोकप्रतिनिधींचे आरोग्य चांगले राहावे यासाठी योजना तयार करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजनेच्या आराखड्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे व योजनेची अंमलबजावणी किती कालावधीत होणे अपेक्षित आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१५-११-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) राज्यातील सर्व जनतेच्या गरजेनुसार आवश्यक आरोग्य सुविधा या विभागांतर्गत कार्यरत असलेल्या जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा स्त्री रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्रे या आरोग्य संस्थांमार्फत पुरविण्यात येतात. लोकप्रतिनिधिंना त्यांच्या दर्जानुसार वैद्यकीय सेवा तसेच वैद्यकीय सेवेसाठी खर्चाची प्रतिपूर्ती शासनाच्या प्रचलित नियम/ धोरणानुसार अनुज्ञेय करण्यात आलेली आहे. तसेच राज्यातील नागरीकांसाठी राज्य आरोग्य हमी सोसायटी महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत गट-ब व गट-क लाभार्थ्यांना हमी तत्वावर उपचार पुरवीत आहे. त्याच प्रमाणे प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत ९९६ उपचाराकरीता रुपये १.५ लक्ष ते रुपये ५ लक्ष रकमेपर्यंतचे व केवळ सदर योजनेत अतंर्भूत असलेल्या २१३ उपचारांकरीता रुपये ५ लक्ष रकमेचे आरोग्य संरक्षण राज्य आरोग्य हमी सोसायटी हमी तत्वावर पुरवित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील "तळवलकर्स बेटर व्हॅल्यू फिटनेस" चे संचालकांनी बँकाची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याबाबत

**(२) ११८३५ (३०-०३-२०२२) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील "तळवलकर्स बेटर व्हॅल्यू फिटनेस" चे आठ संचालक यांनी दोन बँकाची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी तळवलकर्स संचालकांविरोधात शिवाजी पार्क पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बँकांची फसवणूक करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१८-११-२०२२) :** (१) होय.

(२) सदर गुन्ह्यातील आठ आरोपीविरोधात शिवाजी पार्क पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.नों.क्र. ५४२/२१, भा.द.वि. कलम ४०९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२० (ब) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

(३) गुन्ह्यातील फिर्यादी बँकाचे अधिकारी व कर्मचारी यांचे जबाब नोंदवून गुन्ह्यासंबंधित कागदपत्रे प्राप्त करण्यात आले आहेत.

सदर प्रकरणात तपास चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उमरखेडा व मंठा (ता.जि.जालना) तालुक्यातील महवितरणांतर्गत नवीन फिडर मंजूर करण्याबाबत

**(३) १२८४२ (३०-०३-२०२२) श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेडा व मंठा (ता.जि.जालना) तालुक्यातील महावितरणांतर्गत अंभोडा फिडर चा लोड कमी करण्यासाठी उमरखेडा येथील नवीन फिडर मंजूर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त फिडरचे काम पूर्ण करण्याच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने, उक्त फिडरचे काम तातडीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) उमरखेडा हे गाव नवीन स्वतंत्र ११ के. व्ही. उमरखेडा वाहिनीवर असून ही वाहिनी दिनांक २८/०२/२०२२ पासून कार्यान्वित झालेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्हा परिषदेच्या अखत्यारित येणाऱ्या ग्रामपंचायतीला पथदिवे व सार्वजनिक पाणीपुरवठा योजनेच्या वीज देयकाची थकबाकी अदा करण्याबाबत

**(४) १३२५८ (२५-०४-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा परिषदेच्या अखत्यारित येणाऱ्या ग्रामपंचायतीला माहे सप्टेंबर, २०२१ पर्यंत पथदिवे व सार्वजनिक पाणीपुरवठा योजनेच्या वीज जोडण्यांच्या वीज देयकांची थकबाकी रुपये १४७ कोटी एवढी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या थकीत विज देयकाचा भरणा करण्यासाठी राज्य शासनाकडून पहिल्या टप्यात केवळ ३.८१ कोटी निधी जिल्हा परिषदेला प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने नागपूर जिल्हा परिषदेच्या अखत्यारित येणाऱ्या ग्रामीण भागातील ग्रामपंचायतीला पथदिवे व सार्वजनिक पाणीपुरवठा योजनेच्या वीज जोडण्यांच्या वीज देयकाची उर्वरित थकबाकी अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (११-११-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) नागपूर जिल्हा परिषदेच्या अखत्यारित येणाऱ्या ग्रामपंचायतींच्या हद्दीतील रस्त्यावरील पथदिव्यांचे विद्युत देयकांची थकबाकी अदा करण्यासाठी विधानमंडळाचे पावसाळी अधिवेशन, २०२२ मध्ये मंजूर करण्यात आलेल्या पुरवणी मागणीमधून तसेच सन २०२२-२३ या वित्तीय वर्षातील विद्युत देयकांची थकबाकी अदा करण्यासाठी वित्त विभागाने एकत्रित वितरित केलेल्या रुपये ६६२.१२ कोटी इतके निधीपैकी नागपूर जिल्हा परिषदेच्या अखत्यारितील पथदिव्याचे विद्युत देयकाची थकबाकी भागविण्यासाठी रुपये १२,८९,७२,६३९/- इतका निधी महावितरणला उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्यामधून ६८४ ग्रामपंचायत ग्राहकांची माहे ऑगस्ट, २०२२ अखेरपर्यंतची संपूर्ण थकबाकी अदा करण्यात येणार आहे. पुरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात आलेला उर्वरित निधी वित्त विभागाने वितरीत करण्यास मान्यता दिल्यानंतर त्यामधून ग्रामपंचायतींच्या पथदिव्याचे विद्युत देयकाची थकबाकी तातडीने अदा करण्यात येईल.

तसेच ऊर्जा विभागाकडून ग्रामपंचायतीचे पथदिवे व पाणीपुरवठा योजनाचे विद्युत देयकाची रक्कम महावितरणला अदा करण्यासाठी प्रस्ताव विचाराधिन आहे. त्याबाबतचा निर्णय तातडीने घेण्यात येवून उर्वरित थकबाकी अदा करण्यात येईल.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## मुंबईतील चोरी आणि दरोड्याच्या घटनांना आळा घालण्याबाबत

**(५) १३३०२ (३०-०३-२०२२) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत ४ हजार ९८ चोरीचे आणि घरफोडीचे दीड हजार गुन्हे जानेवारी, २०२१ ते डिसेंबर, २०२१ या कालावधीत नोंदविण्यात आली असल्याची बाब मुंबई पोलिसांनी दिनांक १२ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास जाहीर केलेल्या आकडेवारीवरून समोर आली आहे, हे खरे आहे काय;
(२) असल्यास, उक्त गुन्ह्यांपैकी किती गुन्ह्यांचा तपास करण्यात पोलिसांना यश प्राप्त झाले आहे;
(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उर्वरित गुन्ह्यांची तपास जलदगतीने होण्यासाठी, तसेच मुंबईतील चोरी आणि दरोड्याच्या घटनांना आळा घालण्यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१८-११-२०२२) :** (१) व (२) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील पोलीस ठाणेस माहे जानेवारी, २०२१ ते डिसेंबर, २०२१ कालावधीत चोरी व घरफोडी या शिर्षकाखाली दाखल उघड गुन्ह्यांची सांख्यिकी माहिती पुढीलप्रमाणे :

| शिर्षक | दाखल | उघड तपास | अटक आरोपी |
|---|---|---|---|
| चोरी | ४५३४ | १८७० | २५३२ |
| घरफोडी | १६८३ | ९३५ | १३०६ |

(३) गुन्ह्यांचा तपास जलदगतीने होण्यासाठी, तसेच चोरी आणि दरोड्याच्या घटनांना आळा घालण्यासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

बृहन्मुंबई क्युआर कोड आधारीत थर्ड-आय या ॲप्लीकेशनद्वारे क्युआर कोड कार्यान्वित करण्यात आले असून पोलीस अधिकारी / कर्मचारी क्युआर कोड स्कॅन करुन वेळोवेळी तपासणी करीत असतात.

कोबिंग ऑपरेशन व नाकाबंदी तपासणी, महत्वाच्या ठिकाणी भेटी (व्हिजीट बुक), गुप्त बातमीदारांकडून माहिती प्राप्त करून घेणे, मोबाईल व बीट मार्शल पेट्रोलिंग, पायी गस्त, सी. सी. टी. व्ही. कॅमेरे बसविणे. तसेच इनव्हिस्टिगेशन व्हॅनद्वारे घटनास्थळी आरोपीची फिंगरप्रिंट घेणे, इत्यादी उपाययोजना करण्यात येत आहेत.

चोरी व घरफोडीच्या गुन्ह्यांचा तपास जलदगतीने होण्याकरीता गुन्हे प्रकटीकरण पथक अधिकारी व अंमलदार यांना वेळोवेळी गुन्ह्यांच्या तपासाच्या अनुषंगाने मार्गदर्शन करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्याच्या नवीन वीज धोरणासाठी नेमण्यात आलेल्या समितीच्या अहवालाबाबत

**(६) १३३१९ (३०-०३-२०२२) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याचे नवीन वीज धोरण ठरविण्यासाठी दिनांक २० एप्रिल, २०२० रोजी समिती गठीत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तृत समितीचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय,

(३)असल्यास, सदरहू अहवालात करण्यात आलेल्या शिफारशींचे थोडक्यात स्वरूप काय आहे, तसेच सदरहू समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने शासनाने कोणकोणत्या शिफारशी स्वीकारल्या आहेत आणि त्याच्या अंमलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने राज्याचे नवीन वीज धोरण ठरविण्याच्यादृष्टीने समितीचा अहवाल तातडीने प्राप्त होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर समितीचा अहवाल अद्याप शासनास प्राप्त झालेला नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आपेगाव (जि.अहमदनगर) येथील रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत

**(७) १३३३४ (३०-०३-२०२२) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आपेगाव (जि.अहमदनगर) येथील ग्रामस्थांना रस्त्याअभावी ढोरा नदीपात्रातून जलप्रवास करावा लागत असल्याचे दिनांक ४ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीत काय आढळून आले व त्यानुषंगाने आपेगाव ग्रामस्थांसाठी निधी उपलब्ध करुन रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (२३-११-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) मौजे आपेगांव ढोरा ता.शेवगांव जि.अहमदनगर येथील आपेगांव हे तुळापुर वस्ती,शेळकेवस्ती नन्नवरे वस्ती, आपेगांव वस्ती आखतवाडे शिवार अशा विविध वाड्यांमध्ये विखुरलेले आहे.

नदीच्या पलीकडे तुळापूर वस्ती, शेळकेवस्ती नन्नवरे वस्ती इ. वस्त्या वसलेल्या असून सदर वस्त्यांना जोडणारा रस्ता ग्रामा ९३ दर्जाचा असून त्याची एकूण लांबी १ कि.मी. एवढी आहे. सदर रस्त्याच्या ४०० मी लांबीचे मजबूतीकरण व डांबरीकरणाचे काम जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत प्रगतीपथावर आहे.

सदर रस्त्याच्या खालच्या बाजूस सिमेंट बंधारा असून पावसाळयात नदीपात्रात पाणी असे पर्यंत बंधाऱ्याचे भिंतीवरुन नदीपात्रातील पाण्यातून प्रवास करावा लागतो तथापि, सदरच्या रहिवाशांना खालीलप्रमाणे २ पर्यायी मार्ग उपलब्ध आहे.

| अ.क्र. | रस्त्याचे नाव | लांबी | दर्जा |
|---|---|---|---|
| १ | राज्य मार्ग-५२ पासून ढोरजळगांव शे, ढोरजळगांव ने, प्रजिमा -३० तुळापूर वस्ती ते आपेगांव रस्ता | ६.६०० | प्रजिमा-३० |
| २ | राज्यमार्ग -५२ ते प्रजिमा-३४४ आखातवाडे, ग्रामा ४१ तुळापूर वस्ती ते आपेगांव रस्ता | ४.७०० | प्रजिमा-३४४ |

तसेच प्रश्नांकित पुल बांधण्याचा नविन कामाचा प्रस्ताव जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत जिल्हा नियोजन समितीस व नाबार्ड अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागास सादर करणेबाबत जिल्हा परिषदेस सूचना देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर जिल्ह्यातील काटोल व नरखेड या दोन्ही तालुक्यातील शेकडो शेतकरी कृषी पंप वीज जोडणीच्या प्रतिक्षेत असल्याबाबत

**(८) १३४८२ (२९-०४-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महावितरण कंपनी मर्या. नागपूर ग्रामीण, काटोल उपविभागांतर्गत काटोल आणि नरखेड (जि.नागपूर) तालुक्यातील सुमारे ९६० शेतकऱ्यांनी दोन वर्षापूर्वी कृषि पंप वीज जोडणीकरीता अर्ज सादर केले असून डिमांड नोटचाही भरणा केली आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रक्रिया पूर्ण करूनही अद्यापपर्यंत सदर शेतकऱ्यांना कृषी पंपाची वीज जोडणी उपलब्ध करून देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने नागपूर जिल्ह्यातील उक्त शेतकऱ्यांना तातडीने वीज जोडणी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (११-११-२०२२) :** (१) दिनांक ३१/०३/२०१८ नंतर पैसे भरुन १६४० अर्जदार प्रलंबित आहेत.
(२) हे अंशत: खरे आहे. नागपूर जिल्ह्यातील काटोल व नरखेड तालुक्याअंतर्गत दिनांक ३१/०३/२०१८ पर्यंत कृषि पंप वीज जोडणी करीता पैसे भरुन प्रलंबित असलेले एकूण ८७१ अर्जदारांना उच्चदाब वितरण प्रणाली योजनेव्दारे कृषि पंप वीज जोडणी देण्यात आले आहे. तसेच दिनांक ३१/०३/२०१८ नंतर पैसे भरुन प्रलंबित असलेल्या एकूण १६४० अर्जदारांपैकी आजपर्यंत ९३९ शेतकऱ्यांना कृषि पंप वीज जोडणी धोरण-२०२० अनुसार कृषि पंप वीज जोडणी देण्यात आले आहे व २१० अर्जदारांना कृषी आकस्मित

निधीतून (ACF) कृषि पंप वीज जोडणी देण्याकरीता वर्क ऑर्डर देण्यात आली असून कामे प्रगतीपथावर आहे तसेच २०१-६०० मीटर अंतर असलेल्या १७३ शेतकऱ्यांना उच्चदाब वितरण प्रणालीव्दारे कृषि पंप वीज जोडणी देण्याची कामे प्रगतीपथावर आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत झोपडी विकण्याच्या अधिकाराबाबत

**(९) १३५४० (३०-०३-२०२२) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत झोपडी/घर विकण्याचा कालावधी कमी करण्यासाठी, झोपडी तोडल्यापासूनचा कालावधी गृहीत धरण्यासाठी तसेच योजनेतील घरे १० वर्षाच्या आत विकलेल्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने विद्यमान मंत्री महोदयांचा समावेश असलेली एक समिती नेमली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त समितीने याबाबतचा अहवाल शासनास सादर केला आहे काय, सदरहू अहवालात करण्यात आलेल्या शिफारसींचे थोडक्यात स्वरुप काय आहे आणि त्याच्या अंमलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणीत कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१६-११-२०२२) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत वितरित केलेल्या सदनिका विकण्याचा कालावधी कमी करणे या विषयाचा अभ्यास करुन शासनास शिफारस करण्यासाठी दिनांक ०९ मार्च, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये तत्कालीन मंत्री (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.
(२) व (३) सदर समितीने आपल्या शिफारशी शासनास सादर केल्या असून सदरच्या शिफारशी शासनाच्या विचाराधीन आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात जीवन अमृत सेवा (ब्लड ऑन कॉल) योजना सुरु ठेवून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करण्याबाबत

**(१०) १३६२२ (२९-०४-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शासकीय/ खाजगी रूग्णालयात दाखल असलेल्या रूग्णास तातडीने व कमी शुल्कात रक्तपुरवठा व्हावा यासाठी दिनांक १ जानेवारी, २०१४ रोजी पासून जीवन अमृत सेवा (ब्लड ऑन कॉल) योजना सुरु केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेला मिळालेल्या प्रतिसादामुळे राज्य रक्त संक्रमण परिषदेद्वारे या योजनेला मुदतवाढ देवून कोरोना महामारीच्या काळातही सदर योजना सुरु ठेवण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात जीवन अमृत सेवा (ब्लड ऑन कॉल) योजना सुरु ठेवून या योजनेमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना किमान वेतनाच्या आधारे मानधनात वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१८-११-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे,
सदर योजनेस अल्प प्रतिसाद होता तरीही कोरोना महामारीचा काळ विचारात घेऊन ही योजना सुरु ठेवण्यात आली होती.
(३) व (४) सदर योजनेची कामगिरी समाधानकारक व आर्थिकदृष्टया व्यवहार्य नसल्याने, सदर योजना पूनर्विलोकनाधीन असल्यामुळे मानधनात वाढ करण्याबाबतचा निर्णय नियामक मंडळामार्फत पुढे ढकलण्यात आला होता.आता सदरची योजना दिनांक ३१/०३/२०२२ पासून बंद करण्यात आलेली आहे.

---

## विक्रोळी कन्नमवार नगरातील म्हाडाच्या संक्रमण शिबिरांमधील खोल्यांमध्ये घुसखोरी करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(११) १३६६२ (२५-०८-२०२२) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कन्नमवार नगर (विक्रोळी, मुंबई) येथील म्हाडाच्या संक्रमण शिबिरांमधील खोल्यांमध्ये स्थानिकांकडून घुसखोरी करण्यात आली असल्याचे दिनांक ३ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विक्रोळी कन्नमवार नगरातील म्हाडाच्या संक्रमण शिबिरांमधील खोल्यांमधील घुसखोरांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१६-११-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) म्हाडाच्या कन्नमवार नगर, विक्रोळी येथील संक्रमण शिबीरातील ५ गाळयांमध्ये घुसखोरी करण्यात आली होती. घुसखोरी करणाऱ्या ५ घुसखोरांविरूध्द स्थानिक पोलीस स्टेशन, विक्रोळी येथे प्रथम खबरी अहवाल क्र.२८६ दिनांक ३०/०४/२०२२ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.
तद्नंतर सदर घुसखोरांना संक्रमण गाळयांमधून निष्कासीत करण्यासाठी दिनांक १०/०८/२०२२ रोजी पोलीस बंदोबस्त घेऊन निष्कासनाची कारवाई करण्यात येऊन ३ संक्रमण गाळे मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाच्या ताब्यात घेण्यात आले आहेत. उर्वरीत २ गाळयांबाबत निष्कासनाची कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अन्न व औषध प्रशासनाने अपोलो फार्मसी आणि कॉन्सेप्ट्रेन्यूअर व्हेन्वर्स (गोवंडी) यांच्या विरोधात विनापरवाना रक्तदाब मोजणाऱ्या उपकरणाच्या उत्पादनाप्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल केल्याबाबत

**(१२) १४१३० (२५-०८-२०२२) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अन्न व औषध प्रशासनाने विनापरवाना रक्तदाब मोजणाऱ्या उपकरणाच्या उत्पादनप्रकरणी अपोलो फार्मसी आणि कॉन्सेप्ट्रेन्यूअर व्हेन्वर्स (गोवंडी) यांच्या विरोधात पोलिसात गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विनापरवाना सुरु असलेल्या उपकरणाच्या उत्पादनप्रकरणी शासनाने सखोल चौकशी सुरु केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळून आलेल्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली, वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१८-११-२०२२) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

अन्न व औषधे प्रशासनाचे औषध निरीक्षक यांच्या फिर्यादीनुसार दिनांक ०४/०५/२०२२ रोजी गोवंडी पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र.१५३/२०२२ नुसार भा.दं.वि. कलम ४२०,३४ सह औषधे द्रव्ये व सौंदर्य प्रसाधन अधिनियम, १९४० मधील कलम १८ (c), १८ A, ३४, २७ (D), २८ आणि वैद्यकीय उपकरणे नियम २०१७ मधील नियम २० गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा तपासाधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात हजारो रुग्ण यकृत मिळण्याच्या प्रतिक्षेत असल्याबाबत

**(१३) १४१९२ (२५-०८-२०२२) डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.सुधीर तांबे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात हजारो रुग्ण यकृत मिळण्याच्या प्रतिक्षेत असल्याचे दिनांक १९ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने राज्यात सामाजिक संघटनांच्या मदतीने अवयव दानाची चळवळ उभारुन जनजागृती करुन जिल्हावार माहिती घेवून सदर रुग्णांना यकृत मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१८-११-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) अवयवदानाबाबत जनतेमध्ये जनजागृती करण्याकरीता माहिती व जनसंपर्क कार्यालय पुणे व रिजनल ऑर्गन ॲण्ड टिश्यु ऑर्गनायझेशन के.ई.एम.हॉस्पिटल परेल मुंबई, राज्यातील विभागीय प्रत्यारोपण समन्वय केंद्रे मुंबई, पुणे, औरंगाबाद व नागपूर तसेच एनजीओ यांचेमार्फत पथनाट्य, बॅनर्स, पोस्टर्स, सिनेमागृहांमध्ये

जाहिराती, रेडिओ जिंगल्स तसेच चर्चासत्राद्वारे कार्यक्रम राबविण्यात येत असतात. अवयवदानाची टक्केवारी वाढण्यासाठी महाराष्ट्र शासनामार्फत दरवर्षी ३० ऑगस्ट ते १ सप्टेंबर, या कालावधीत ३ दिवसांचा महाअवयवदान महोत्सव, ही राज्यस्तरीय मोहिम राबविण्यात येते. या अभियानांतर्गत अवयवदान जनजागृतीसाठी रांगोळी स्पर्धा, लघुचित्रफिती दाखविणे, चर्चासत्रे, मार्गदर्शनपर शिबीरे आयोजित करण्यात येतात.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्राच्या सीमेवरील राज्यात टोमॅटो फ्लुचे रुग्ण आढळून येत असल्याबाबत

**(१४) १४२४१ (२५-०८-२०२२) श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या सीमेवरील कर्नाटक व केरळ राज्यात टोमॅटो फ्लुच्या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याचे दिनांक १६ मे,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हा आजार संसर्गजन्य असून लहान मुलांना होत असल्याने पालकवर्गात चिंता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने या संदर्भात माहिती घेवून हा आजार राज्यात फैलावू नये म्हणून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१८-११-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.
दिनांक ११ मे, २०२२ रोजी केरळ राज्यात टोमॅटो फ्ल्यू चे ८० रुग्ण आढळले हे खरे आहे. तथापि, या आजाराचे रुग्ण कर्नाटक राज्यात आढळले नाहीत.
(२) हे अंशत: खरे आहे.
टोमॅटो फ्ल्यू हा आजार शास्त्रीय परिभाषेत हॅण्ड फूट माऊथ डिसीज म्हणून ओळखला जातो आणि तो विषाणूजन्य आजार आहे. हा आजार मुख्यत्वे लहान मुलांना होतो. त्यामुळे पालकांना चिंता वाटणे स्वभाविक आहे. तथापि, हा सर्वसाधारणपणे सौम्य स्वरुपाचा आजार असून लक्षणाधारीत उपचार आणि योग्य प्रतिबंधात्मक खबरदारीने बरा होतो आणि टाळता येऊ शकतो. या अनुषंगाने जनतेचे विविध माध्यमातून प्रबोधन करण्यात आले आहे.
(३) टोमॅटो फ्ल्यू हा आजाराचा एकही रुग्ण महाराष्ट्रात आढळलेला नाही. तथापि, या आजाराच्या प्रतिबंध आणि नियंत्रणासाठी राज्यातील सर्व जिल्हयांना सर्वेक्षणाबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. तसेच जनतेला विविध माध्यमातून आवश्यक आरोग्य शिक्षण देण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील अनेक कारागृहात जास्तीत जास्त संख्येत कैद्यांना ठेवण्यात आल्याबाबत.

**(१५) १४३५३ (२५-०८-२०२२) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक कारागृहात जास्तीत जास्त संख्येत कैद्यांना ठेवण्यात आले असल्याचे दिनांक २६ एप्रिल, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कैद्यांच्या वाढत्या संख्येच्यादृष्टीने कारागृह वाढविण्याबाबत तसेच नव्याने काही कारागृहे बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२४-११-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) कारागृहातील कैद्यांच्या वाढत्या संख्येच्यादृष्टीने राज्यातील येरवडा (पुणे) येथील महिला कारागृह, मुंबई, औरंगाबाद, विसापूर, स्वतंत्रपूर खुली वसाहत आटपाडी सांगली येथे बॅरेक्स बांधण्याचे काम पूर्ण झालेले आहे. तर ठाणे, नागपूर, चंद्रपूर, यवतमाळ, सातारा, अहमदनगर, येरवडा खुले जिल्हा कारागृह येथे बॅरेक्स बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

तसेच, येरवडा (पुणे) आणि ठाणे मध्यवर्ती कारागृहाच्या अस्तित्वातील जागेवर तसेच बारामती, गोंदिया, हिंगोली, पालघर, अहमदनगर (नारायणडोह) येथे नवीन कारागृहांचे बांधकाम प्रस्तावित असून, त्यानुषंगाने महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या. वरळी, मुंबई यांच्याकडून नकाशे व अंदाजपत्रक मागविण्यात आलेली आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## झोपडपट्टी पुनर्विकास योजनेत झोपडपट्टीवासीयांना घरे देण्याच्या निर्णयाबाबत

**(१६) १४६३२ (२५-०८-२०२२) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) झोपडपट्टी पुनर्विकास योजनेत रुपये अडीच लाख शुल्क आकारुन झोपडपट्टीवासीयांना घरे देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेंतर्गत कोणत्या कालावधीपासून ते कोणत्या कालावधीपर्यंतच्या झोपड्या पुनर्विकासासाठी पात्र ठरविण्यात येणार आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन झोपडपट्टीवासीयांना घरे देण्याच्या निर्णयाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, सदरहू निर्णयाच्या अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१६-११-२०२२) :** (१) हे खरे नाही.

तथापि, या विषयासंदर्भात अभ्यास करुन शासनास शिफारस करण्यासाठी तत्कालीन मा.मंत्री (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने सशुल्क पुनर्वसन सदनिकांसाठी सरसकट अडीच लाख इतके शुल्क आकारण्याची शिफारस केली आहे.

(२) दिनांक १६/०५/२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार दिनांक ०१/०१/२००० नंतर परंतू दिनांक ०१/०१/२०११ रोजी अथवा त्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या सशुल्क पुनर्वसनासाठी पात्र झोपडीधारकांना याचा लाभ देता येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात विशेषत: पूर्व विदर्भातील वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, नागपूर व गोंदिया जिल्ह्यात डेंग्यू रूग्ण आढळून आल्याबाबत

**(१७) १४८२१ (२५-०८-२०२२) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: पूर्व विदर्भातील वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, नागपूर व गोंदिया जिल्ह्यात सन २०२१-२२ या वर्षात डेंग्यूचे ३ हजार ६२८ रूग्ण आढळले असून २४ रुग्णांचा मृत्यू झाला असल्याची बाब दिनांक १६ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रादुर्भाव रोखण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१८-११-२०२२) :** (१) होय हे खरे आहे.

(२) डेंग्यू हा आजार एडीस डासाच्या मादीपासून होतो. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यात खालील डास प्रतिबंधक उपाययोजना केलेल्या आहेत.

१) सर्वेक्षण-

i) आरोग्य कर्मचाऱ्यां मार्फत नियमित ताप सर्वेक्षण.

ii) उद्रेकाच्या ठिकाणी सर्व ताप रुग्णांचे जलद ताप सर्वेक्षण उद्रेक असेल तर जिल्हयांनी हा उद्रेक २४ ते ४८ तासात कळविणे आवश्यक केले आहे.

iii) १५ महानगरपालिकांमध्ये या आजाराच्या नियंत्रणासाठी पारेषण कालावधीमध्ये ३७५ कर्मचाऱ्यांची (ब्रीडींग चेकर्स) ५ महिन्यासाठी नेमणूक करणेत आलेली आहे.

iv) राज्यात डेंग्यू विषाणूच्या तापाच्या निदानासाठी ४३ सेंटीनल सेंटर्सची स्थापना केली असून राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्था पुणेयेथेही निदानाची व्यवस्था आहे.

v) साथरोग उद्रेकाच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी जिल्हा पातळीवर शीघ्र प्रतिसाद पथके कार्यरत.

vi) डेंग्यू रुग्णांना लक्षणाधारीत उपचार.

vii) सर्व आरोग्य संस्थांना औषधे व इतर साधन सामुग्रीचा पुरेसा पुरवठा.

२) किटक नियंत्रणासाठी करीत असलेल्या उपाययोजना-

i) उद्रेकाच्या ठिकाणी किटकशास्त्रीय सर्वेक्षण, आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत रो १०% घरामध्ये किटकशास्त्रीय सर्वेक्षण.

ii) नागपूर ८ विभागामध्ये २,३८,२०० मच्छरदाण्याचे (LLIN) वाटप करण्यात आले.

iii) समस्याग्रस्त गोंदिया, चंद्रपूर, व गडचिरोली जिल्ह्यातील एकूण ११७१ गावातील ४,६९,६०३ इतक्या लोकसंख्येमध्ये किटकनाशकाची फवारणी करण्यात आलेली आहे.

iv) नागपूर विभागामध्ये मे महिनाअखेर एकूण १९६८ गप्पी पैदास केंद्र कार्यान्वित असून ९९४१ डास्योत्पत्ती स्थानांमध्ये गप्पी मासे सोडण्यात आले.

३) जनजागृती –

i) शालेय डेंगयू जागृती माहिम-शाळेतील मुलांना डास अळया ओळखण्याचे प्रशिक्षण देण्यात येते.

ii) जुलै महिना हा डेंग्यू प्रतिरोध महिना म्हणून विविध कार्यक्रम राबविण्यात येतात.

iii) दरवर्षी जागतिक डेंग्यू दिन १६ मे या दिवशी जिल्ह्यात प्रभात फेरी काढून डेंग्यू जनजागृती करण्यात येते.

iv) गणेश उत्सव, दुर्गा पुजा उत्सव येथे डेंग्यू आजारविषयी प्रदर्शन लावूनजनमानसात किटकजन्य आजाराबाबत जन जागृती कार्यक्रम राबविण्यात आले.

४) शासकीय तसेच खाजगी वेद्यकीय व्यावसायिकांचे डेंग्यू रुग्ण व्यवस्थापन विषयक कार्यशाळेचे आयोजन.

५) उद्रेकग्रस्त ठिकाणी उपाययोजनांच्या मार्गदर्शनासाठी जिल्हा/ विभागीय/राज्यस्तरीय अधिकाऱ्यांच्या भेटी.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात महात्मा फुले जन आरोग्य योजनेचे निकष पूर्ण करणाऱ्या रुग्णालयांमध्ये योजना सुरु करण्याबाबत

**(१८) १४९१० (२५-०८-२०२२) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड सह राज्यात महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत आवश्यक असलेले निकष पूर्ण केलेल्या रुग्णालयांना महात्मा फुले जन आरोग्य योजना लागू करण्यात आली नसल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निकष पूर्ण करणाऱ्या रुग्णालयांना महात्मा फुले जन आरोग्य योजना लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.तानाजी सावंत (१८-११-२०२२) :** (१) हे खरे नाही.

आज रोजी संपूर्ण राज्यात १००० रुग्णालये (२६८ शासकीय व ७३२ खाजगी) अंगीकृत करण्यात आले आहेत.

१००० रुग्णालयापैकी नांदेड जिल्ह्यात ३३ (शासकीय १० व २३ खाजगी) रुग्णालये अंगीकृत करण्यात आले आहेत.

दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९ च्या शासन निर्णयानुसार प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत अंगीकृत करण्यात येणाऱ्या रुग्णालयांची प्रत्येक तालुक्यात किमान २ रुग्णालये याप्रमाणे महसूली विभाग निहाय संख्या निश्चित करण्याचे, राज्याच्या सर्व महसूल विभागात एकसमान पध्दतीने रुग्णालयांचे जाळे तयार करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर जिल्ह्यातील मोवाड प्राथमिक आरोग्य केंद्रातील गैरवर्तणूक करणाऱ्या डॉक्टर विरुध्द कारवाई करण्याबाबत

**(१९) १४९९२ (२०-०७-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील मोवाड प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉ. प्रविण उमरगेकर हे मद्य प्राशन करुन ओपीडी मध्ये रुग्णांची तपासणी करत असल्याचे, आरोग्य केंद्रामध्ये अनुपस्थित राहत असणे, महिला कर्मचाऱ्यांसोबत गैरवर्तणूक करणे व आरोग्य केंद्रात कर्मचाऱ्यांना व येणाऱ्या रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना अर्वाच्च भाषा वापरत असल्याच्या लेखी तक्रारी आरोग्य केंद्रातील महिला कर्मचारी व स्थानिक गावकऱ्यांनी आरोग्य अधिकारी यांच्याकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्राथमिक आरोग्य केंद्रात महिला कर्मचाऱ्याला अपमानजनक वागणूक दिल्यामुळे तीन सदस्यीय चौकशी समिती नेमली असून चौकशीसाठी डॉ. उमरगेकर गैरहजर राहत असल्याचे दाखवून अद्यापही समितीने अहवाल शासनास सादर केला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने आरोग्य केंद्रातील महिला कर्मचारी व स्थानिक गावकऱ्यांनी केलेल्या लेखी तक्रारींची चौकशी करुन गैरवर्तणूक करणाऱ्या डॉक्टर विरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१८-११-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) त्रिसदस्यिय समीतीने सदर प्रकरणी चौकशी केली असून डॉ.प्रविण उमरगेकर हे घटनेच्या दिवशी मद्यप्राशन केले नसल्याचे संबंधितांनी जबाबात नमुद केले आहे. तथापि, आरोग्य केंद्रातील आरोग्य सेवा सुरळीत राखणे व प्रशासकीय कामकाज नीट चालविण्याच्या दृष्टीने त्यांचा प्रभारी वैद्यकिय अधिकारी पदाचा कार्यभार काढण्यात आला असून त्यांना ताकीद देण्यांत आलेली आहे.

(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

## अकोला जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात औषधे उपलब्ध करण्याबाबत

**(२०) ५१०४७ (२१-०७-२०१४) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात अनेकदा डॉक्टर गैरहजर असल्याने रुग्णांना वेळेत उपचार मिळत नसल्यामुळे त्यांना औषधोपचारासाठी खासगी रुग्णालयात जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त प्राथमिक आरोग्य केंद्रात पुरेशी औषधे उपलब्ध नसल्यामुळे रुग्णांना बाहेरुन औषधे खरेदी करवी लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

**डॉ. तानाजी सावंत (२१-११-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.